# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १२/०९/२०२४ (गुरूवार) दुपार

---

### वारंवार चोरी, घरफोडी तसेच शरीराविरुद्धचे गुन्हे करणारा आरोपी जिल्हयातून हद्दपार

कळमेश्वर शहरातील स्वत:ला गुंड म्हणुन फिरणारा गुन्हेगार नामे— अशोक निलचंद सहारे, वय ३४ वर्षे, रा. इंदिरा नगर झोपडपट्टी कळमेश्वर याचेवर अनेक प्रकारचे गुन्हे नोंद आहे. ज्यामध्ये घरफोडी, चोरी तसेच शरीराविरूद्धचे गुन्हे पोलीस ठाणे कळमेश्वर येथे दाखल आहे. त्याने आपली दहशत कळमेश्वर शहरात निर्माण करण्याकरीता लोकांना धमकाविने तसेच त्यांना विनाकारण मारहाण करून आपले वर्चस्व स्थापीत करण्याचा प्रयत्नात असल्याचे कळमेश्वर पोलीसांचे लक्षात आले त्याचेवर अनेक वेळा प्रतिबंधक कारवाही केली असता त्याचे वागणूकीत कोणताही बदल न होता तो स्वत:ला डॉन म्हणून कळमेश्वर शहरात वावरत असल्याने परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी. करीता कळमेश्वर पोलीसांनी त्याचे विरूद्ध कलम ५६(१), (ब) मुंबई पोलीस कायदयान्वये प्रतिबंधक कारवाही करून मा. एस. डी. एम. सा. सावनेर यांना सादर करून सदर प्रकरणाची चौकशी मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावेनर श्री. अनिल म्हस्के सा. यांनी केली. सदर चौकशी अहवाल मा. एस. डी. एम. सा. सावनेर यांना सादर केल्यावरून मा. एस. डी. एम. सा. सावनेर यांनी नमूद ईसमास ९० दिवसाकरीता नागपूर शहर तसेच नागपूर ग्रामीण हद्दीतून तडीपार केले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. श्री. अनिल म्हस्के सा. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावेनर विभाग सावेनर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि योगेश कामाले, ठाणेदार पोस्टे कळमेश्वर यांनी प्रस्तावित केली होती. सदर प्रस्ताव तयार करणेकामी मदनिस पोलीस अंमलदार मनिष सोनोने यांनी मदत केली. मा. एस. डी. एम. सा. सावनेर यांचे आदेश प्राप्त होताच सदर आदेश मा. पोनि मनोज काळबांडे सा. यांनी आदेशाची बजावणी करून नमूद गुन्हेगार नामे अशोक निलचंद सहारे रा. कळमेश्वर यास पोहवा प्रजोक्त तायडे यांचे हस्ते नागपूर जिल्हयातून हद्दपार केले.

## पो.स्टे. मौदा हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ११/०९/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील मौजा गुमथाळा शिवार, कामठी येथे काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे मौदा येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा गुमथाळा शिवार, कामठी येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) दिवाकर मुरलीधर वाघ, वय ३८ वर्ष, २) राकेश प्रभाकर मोहीते वय ३३ वर्ष, ३) गंगाधर जगन घोगरे वय ४४ वर्ष, ४) रविंद्र गणपत वाघ वय ४५ वर्ष ५) साहेबराव नामदेव ठोके वय ४५ वर्ष ६) राजेश अंबर वाघ वय ३७ वर्ष सर्व रा. गुमथाळा ता. कामठी ७) ताजेश्वर भाउराव दवरे वय ५१ वर्ष रा. उनगाव ता. कामठी** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन सर्व आरोपींची अंगझडती घेतली असता आरोपींच्या ताब्यातून नगदी ३९००/—रू व डावावरील नगदी ८०/—रू व ५२ तासपत्ते असा एकूण ३९८०/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे मौदा येथे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि प्रमोद घोंगे, पोलीस उपनिरीक्षक अरविंदकुमार जगने, नापोशि तुषार उडकुले, रोशन पाटील, पोअं गोरखनाथ निंबार्ते, रूपेश शेंद्रे, प्रदीप खिल्लारे, चालक पोहवा जीवनकुमार देवांगन यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर